| MHLA050001202025 | **वि.दि.दा. क्र.०६/२०२५**<br>**राहेबा वि. गणपती व इतर** |
|---|---|

**<u>नि.क्र.०५ वरील आदेश</u>**

**०१.** प्रस्तुत अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहीता १९०८ क्रम ३९ नियम १ व २ अन्वये दाखल केला आहे.

**०२.** थोडक्यात वाद कथन असे की, वादी प्रतिवादी क्र.१, ४ व ५ ही सख्खी भावंडे असून प्रतिवादी क्र.६ ही त्यांची बहिण आहे. प्रतिवादी क्र.२ ही प्रतिवादी क्र.१ ची पत्नी आणि प्रतिवादी क्र.३ हा प्रतिवादी क्र.१ व २ चा मुलगा आहे.

**०३.** वादी प्रतिवादींचे एकत्र हिंदु कुंटूंब असून दावा मिळकती या एकत्र कुंटूंबाच्या आहेत. गट क्र.१००, घर क्र.६७ या मिळकती वडिलोपार्जित असून गट क्र.६९ व घर क्र.ए.२७९५ या मिळकती वादी, प्रतिवादींच्या नावे एकत्र कुंटूंबाच्या उत्त्पनातून खरेदी केलेल्या आहेत. दावा मिळकतींचे वाटप झाले नाही. वादीचा त्यात १/५ अविभक्त हिस्सा आहे. तो वाटून मागितला असता त्यास नकार दिला म्हणून वाटपाचा दावा दाखल आहे. दावा मिळकत दाव्याच्या निकालापर्यंत प्रतिवादींनी तबदील करु नये म्हणून तुर्तातुत ताकीदचा सदर अर्ज दिला आहे.

**०४.** प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी नि.क्र.३० लगत आपले म्हणणे दिले. त्यांनी दावा मान्य केला. वाटप होण्यास हरकत नाही असे नमुद केले.

**०५.** प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी नि.क्र.३५ लगत आपले म्हणणे दिले. दाव्यात सर्व पक्षकार व मिळकती नमुद केलेल्या नाहीत. छत्रपती संभाजीनगर येथील मिळकत याकामी नमुद नाही. बाजारमुल्य कमी दाखवून कमी मुद्रांक भरला आहे. वादी, प्रतिवादी यांचे वडील ज्ञानोबा हे स्वातंत्र्य सैनिक होते व

सरकारने त्यांना दिलेली मिळकत वादीने हडप केली. पुणे, मुंबई, पालघर या ठिकाणी वादी व प्रतिवादींच्या मिळकती आहेत, त्या या कामात सादर केल्या नाहीत. प्रतिवादी क्र.१ ने स्वकष्टाने मिळकत खरेदी घेतली आहे. त्यामुळे, त्यात वादीचा संबंध नाही, म्हणून दावा व अर्ज रद्द करावा अशी विनंती करण्यात येते.

**०६.** प्रतिवादी क्र.६ विरुध्द दावा एकतर्फा चालला.

**०७.** उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**०८.** यावरुन माझ्या विचारार्थ येणारे मुद्दे, त्यावरील निष्कर्षांसह खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | वादीस सकृतदर्शनी दावा आहे काय ? | **होय.** |
| **२.** | सोयीचा तूळ वादीच्या पक्षात आहे काय ? | **होय.** |
| **३.** | अर्ज नाकारल्यास वादीस नुकसान होते काय ? | **होय.** |
| **४.** | कोणता आदेश ? | **अर्ज मंजूर.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ बाबत :-**

**०९.** दावा मिळकतींचे उतारे वादीने नि.क्र.४ सोबत सादर केले आहेत. वादी, प्रतिवादींच्या दरम्यान असलेले नातेसंबंध उभय पक्षांना आक्षेपीत नाहीत. वादी, प्रतिवादींचे एकत्र कुंटूंब आहे की स्वतंत्र कुंटूंब आहे याबद्दल प्रतिवादींनी आपल्या कैफीयतीमध्ये उल्लेखीत केलेले नाही. निव्वळ काही मिळकती दाव्यात सामील नाहीत त्याची विशिष्टपणाने माहिती देवून, तसेच काही पक्षकारांची नावे

नमूद करुन ती याकामी सामील नाहीत, म्हणून दावा रद्द करावा अशी विनंती करण्यात आली.

**१०.** प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची कैफीयत नि.क्र.१५ व १६ मध्ये दावा मिळकत भुखंड क्र.१११ ही जमीन खरेदीची असल्याचे तसेच अहमदपूर येथील घर क्र.ए-२७९५ हे खरेदीचे असल्याचे नमुद आहे. गट क्र.१०० मौजे हाळणी ही प्रतिवादी क्र.१ ची वडिलोपार्जित जमीन आहे. ग्रामपंचायत मिळकत क्र.६७ ही एकत्र कुंटूंबाची आहे असे नमुद केले आहे.

**११.** वादीच्या कथनानुसार दावा मिळकती या जर एकत्र कुंटूंबाच्या आहेत, तर त्या पुर्वापार त्यांच्या नावे असल्याबद्दल ७/१२ उतारा दाखल करणे आवश्यक आहे. वादीने असे उतारे दाखल केलेले नाहीत. प्रतिवादींनी कैफीयतीमध्ये विशिष्टपणाने सांगितलेल्या मिळकती या खरेदी मालकीच्या असतील आणि त्या जर प्रतिवादी क्र.१ च्या नावे खरेदी घेतल्या असतील तर वादी व प्रतिवादी यांचे वर्तनाने किंवा कायदेशीर हुकूमनाम्याने किंवा महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियमामधील तरतुदींप्रमाणे त्यांच्यामध्ये दावा मिळकतींचे वाटप होवून विभक्तपणा आला आणि तो विभक्तपणा स्वईच्छेने एकमेकांच्या माहितीत, जाणिवेत, कृतीत येवून त्यानूसार प्रत्येकजणांचे वर्तन सुरु झाले, याबद्दल विशिष्टपणाने प्रतिवादींने कथन केलेले नाही. त्यामुळे, प्रतिवादी यांच्या नवीन खरेदी केलेल्या मिळकती या एकत्र खरेदी केल्या किंवा स्वतंत्र खरेदी केल्या याबद्दल सकृतदर्शनी पुरावा नाही. मिळकतींचे अस्तीत्व उभय पक्षांना मान्य आहे. त्यांचे सत्व (Title) एकत्रातील आहे की स्वतंत्रपणाचे आहे एवढाच वाद असल्याने त्या मिळकतीत कोणत्याही स्वरुपात तबदीलीचा व्यवहार होऊ नये ही कायद्यान्वये निर्माण झालेली गरज आहे.

**१२.** वादी याने दावा मिळकतीमधील प्रतिवादींच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये अशा स्वरुपाचे कथन किंवा दाद मागितलेली नाही. म्हणून,

त्या मिळकतीत तबदीली होवू नये ही दाद रास्त आहे. सबब, याकामी अशी दाद वादीस न मिळाल्यास भविष्यात जर दावा मिळकती त्रयस्थ इसमांना विकल्या गेल्या तर आणखी नवीन वाद निर्माण होईल. त्यामुळे, दाव्याचा कालावधी वाढेल आणि विहित मुदतीत वादी, प्रतिवादी यांना न्यायनिर्णय होवून मिळणार नाही. या सर्व कारणांचा विचार करता वादी मागत असलेली दाद मिळण्यास तो पात्र आहे. सबब, मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी देऊन मुद्दा क्र. ४ च्या उत्तरार्थ खालील आदेश करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. दाव्यात नमुद मिळकत प्रतिवादींनी दाव्याचा अंतिम निकालापर्यंत त्रयस्थ इसमांना हस्तातंरीत करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादींविरुध्द देण्यात येते.

३. अर्जाचा खर्च अंतिम निकालात अंतर्भूत करण्यात येतो.

स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**

दि.०६/०४/२०२६.

दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर